MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd

# महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित

अधीक्षक अभियंता यांचे कार्यालय,
अउदा, सवसु मंडल, कळवा,
ठाणे–बेलापूर रोड, पो. ऐरोली नोड, पो. बॉ. नं. 3ऐरोली, नवी मुंबई– 400708
दुरध्वनी कमांक–022–27601845/1916,
फॅक्स क– 022–7601612
CIN No. U40109MH2005SGC153646
**E-Mail:** se7100@mahatransco.in
**Website :** www.mahatransco.in

संदर्भः– अअ/अउदा/संवसु/मंडल/कळवा/तांत्रिक/बेरोजगार 01026 दिनांकः 18 JUN 2021

**विषय** :- सुशिक्षित बेरोजगार अभियंता विद्युत यांना लॉटरी पद्धतीने ठाणे जिल्हयातील कामे वाटप करण्यासंबधीची लॉटरी बैठक दिनांक ३०.०६.२०२१ ला घेणे बाबत.

**संदर्भ** :- १) MBR No. 112 /10 Dt. 17.11.2019

२) MSETCL/CO/TR O&M/SE-II/EE-VIII/12883 Dt.05.12.2016

सुशिक्षित बेरोजगार अभियंता (विद्युत) यांना कामे वाटपाची योजना महापारेषण कंपनीने संदर्भ क्रमांक १ व २ अन्वये लागु केली आहे.

सदर परिपत्रकाला अनुसरून अधिक्षक अभियंता अउदा संवसु मंडल, कळवा या कार्यालयात सुशिक्षित बेरोजगार अभियंता (विद्युत) यांची नोदणी करणे सुरू आहे. या योजने अंतर्गत अधिक्षक अभियंता अउदा संवसु मंडल, कळवा ठाणे–बेलापूर रोड, पो. ऐरोली नोड, पो. बॉ. नं. 3ऐरोली, नवी मुंबई– 400708 या कार्यालयात दिनांक .३०.०६.२०२१. रोजी सकाळी ११.०० वाजता खाली दिलेल्या कामासाठी खालील नमूद केलेल्या अटी व शर्तीच्या अधीन राहुन प्रथम लॉटरी (२०२१-२२) बैठक आयोजीत करण्यात आली आहे.

| अनु. क. | कामाचे नाव | रक्कम (सर्व करासहीत) | जिल्हा |
|---|---|---|---|
| 1 | Annual contract for the work of garden maintenance & grass / shub removing at various substation under EHV (O&M) Dn. Kalwa. | **Rs. 1,85,678/-** | ठाणे |
| 2 | Providing and fixing of lighting materials for main control room PLCC room. Battery room. Charger room at 220kV Colourchem s/stn. under EHV (O&M) Dn. Bhandup. | **Rs. 2,25,968/-** | ठाणे |

अटी व शर्ती

१) सुशिक्षित बेरोजगार अभियंता ;विद्युतद्ध यांनी लॉटरीसाठी उपस्थित राहतांना खालील तपशिल सोबत आणणे बंधनकारक आहे.

अ. महाराष्ट्र शासनाची ;विद्युतद्ध कामासाठीची वैध अनुज्ञाप्ती.

ब. सर्व शासकीय / निमशासकीय /खाजगी आस्थापना या मध्ये एकुण केलेल्या व चालु असलेल्या कामाचा तपशिल.

क. महापारेषण कंपनीने सुशिक्षित बेरोजगार म्हणुन दिलेले वैध प्रमाणपत्र.

ड. रहिवासी प्रमाणपत्र

२) अउदा संवसु मंडल कळवा या कार्यालयाच्या कार्यक्षेत्रातील रहिवासी असलेल्या वैध सुशिक्षित बेरोजगार अभियंता (विद्युत) यांनाच या लॉटरी मध्ये सहभाग घेता येईल कार्यक्षेत्राबाहेरील बेरोजगार अभियंता लॉटरी मध्ये सहभाग घेवू शकणार नाही.

३) लॉटरी पध्दतीने कामे वाटपाच्या वेळेस सदर अभियंता हा सुशिक्षित बेरोजगार असावा तसेच तो कोणत्याही प्रकारचे शिक्षण घेत नसावा. उपस्थित असलेल्या सुशिक्षित बेरोजगार अभियंता यांने दिलेली माहिती खोटी आढळुन आल्यास त्याला महापारेषण कंपनीने दिलेला नोंदणीकृत परवाना रद्द करण्यात येईल. मसेच महापारेषण ने या योजने अंतर्गत काढलेल्या पुढील कोणत्याही लॉटरी मध्ये सहभाग घेता येणार नाही व सदर अभियंत्यावर योग्य ती कार्यवाही करण्यात येईल.

४) या लॉटरी प्रक्रीयेसाठी अउदा संवसु मंडल कळवा या कार्यालयात दिनांक ३०.०६.२०२१ पर्यंत नोंदणीकृत परवाना यांचेच अर्ज ग्राहय धरण्यात येतील.

सदर लॉटरी बैठक हि दिनांक ३०.०६.२०२१. रोजी ११.०० वा अउदा संवसु मंडल कळवा या कार्यालयात आयोजीत करण्यात आली आहे. वरील सर्व अटी व शर्ती पुर्तता करणा-या वैध सुशिक्षित बेरोजगार अभियंता यांना आवाहन करण्यात येते की त्यांनी नियोजीत वेळेत या कागदपत्राच्या सत्य प्रत सोबत या कार्यालयात उपस्थित रहावे.

आपला विश्वासू,

(महेश बी. भागवत)
अधीक्षक अभियंता
अ.उ.दा. सं.व सु. मंडल,कळवा.

**प्रत सविनय सादर:-**
मुख्य अभियंता, अउदा प्रकल्प -नि-सवसु परिमंडळ, वाशी

**प्रत रवाना :-**
१.कार्यकारी अभियंता,अउदा संवसु विभाग, भांडूप/ कळवा/ बोईसर /४०० केव्ही कळवा / कुडूस.
२.व्यवस्थापक (वि.ले)अउदा संवसु मंडल कळवा
३.नोटीस बोर्ड